30-12-2016



# तंत्रज्ञानात्मक कौशल्य विकास उद्योगांना पूरक : डॉ. पवार

**(पान १ वरून)** शिक्षण देऊन तिचा विधायक कार्यासाठी वापर करता येईल. डॉ. क्रांतिकुमार पाटील म्हणाले, जागतिकीकरणाच्या स्पर्धेला तोंड देण्यासाठी कौशल्य केंद्रित ज्ञान हवेच. ज्ञानामधील नव्या बदलांचा स्वीकार केला पाहिजे. जगाच्या गरजांचा विचार करून कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमांची रचना केली पाहिजे. 'गोकुळ'चे महाव्यवस्थापक आर. सी. शहा म्हणाले, खासगी क्षेत्र असो किंवा सहकारी क्षेत्र असो, तेथे कौशल्येप्राप्त सेवाभावी व्यक्तीची गरज आहे. प्रत्येकामध्ये कामाविषयी निष्ठा व स्वतःजवळील कौशल्य शिद्ध करण्याची क्षमता असली पाहिजे. उद्योजक व्ही. एन. देशपांडे म्हणाले, प्रत्येक गोष्टीबद्दल कुतूहल हवे. आपण ज्ञानाच्या बाबतीत अद्ययावत असले पाहिजे. स्वतःला प्रेरित करणे ही विकासाची गुरुकिल्ली आहे. त्यासाठी स्वतःकडे संप्रेषण तंत्र परिणामकारक सादरीकरण, सहकार्याची भावना, नावीन्याची आस, अपयशावर मात, जिंकण्यासाठी खेळणे या गोष्टी आवश्यक आहेत.

चर्चासत्राचे संयोजन प्रा. डॉ. वर्षा मैंदर्गी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. नीता धुमाळ यांनी केले. आभार रेखा पंडित यांनी मानले. कार्यक्रमास प्रा. एन. एस. शिरोळकर, प्रा. डॉ. टी. एस. थोरात, प्रा. ए. एस. घस्ते, प्रा. डॉ. एन. व्ही. पोवार, प्रा. डॉ. सुजय पाटील आदींचे सहकार्य लाभले.